# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १६.०९.२०२५

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (१०.०९.२०२५ ते १६.०९.२०२५) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१७.०९.२०२५ ते २१.०९.२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | दिनांक | | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| ०.० | ०.० | ०.० | २.८ | २.० | ०.० | ०.४ | पाऊस (मिमी) | | ८ | १० | ६ | ६ | ४ |
| २९.५ | ३१.२ | ३०.५ | ३०.० | २९.० | २९.६ | २९.० | कमाल तापमान (अं.से.) | | २८ | २८ | २८ | २९ | ३० |
| २०.१ | १९.८ | २०.८ | २२.० | २१.० | २२.२ | २१.८ | किमान तापमान (अं.से.) | | २२ | २२ | २२ | २२ | २२ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | स. | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ७ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | दु. | | | | | | |
| ९१ | ८९ | ८८ | ९५ | ९० | ९६ | ९३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८८ | ८८ | ८६ | ८७ | ८४ |
| ६३ | ६४ | ६६ | ७१ | ७४ | ७९ | ८४ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८४ | ८४ | ८१ | ८१ | ७९ |
| २.३ | २.७ | २.५ | १.९ | २.३ | २.२ | १.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | | ४ | ४ | ५ | ६ | ६ |
| प.नै. | प.नै. | प. | प. | नै. | नै. | प. | स. | वाऱ्याची दिशा | प. | प. | प. | प.नै. | प. |
| प.नै. | प. | नै. | वा. | वा. | प.वा. | प.वा. | दु. | | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२५ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२५पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ५.२ | ११८५.८ | ८५ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार **कोल्हापूर जिल्ह्यामध्ये** दिनांक १७ ते २१ सप्टेंबर दरम्यान आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील घाट भागात दिनांक १७ व १८ सप्टेंबर रोजी बऱ्याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची तसेच दिनांक १९, २० व २१ सप्टेंबर रोजी काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या मध्य व पूर्व भागात दिनांक १७ व १८ सप्टेंबर रोजी काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची, दिनांक १९, २० व २१ सप्टेंबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पुढील ५ दिवसांत कमाल तापमान २८.० ते ३०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवसांत किमान तापमान २२.० ते २३.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८४ ते ८८% या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता ७९ ते ८४% या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०४ ते ०६ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २१ ते २७ सप्टेंबर २०२५ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे तसेच कमाल तापमान सरासरी दरम्यान तर किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ❖ पक्व झालेल्या मूग आणि उडीद पिकांची काढणी करावी व पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा<br>❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड अ‍ॅप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड अ‍ॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>❖ मेघदूत अ‍ॅप डाउनलोड करण्यासाठी लिंक : https://play.google.com/store/apps/details?id=com.aas.meghdoot<br>❖ दामिनी अ‍ॅप डाउनलोड करण्यासाठी लिंक : https://play.google.com/store/apps/details?id=com.lightening.live.damini |
| संदेश | | ❖ पक्व झालेल्या मूग आणि उडीद पिकांची काढणी करावी व पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा |
| भात | पोटरी | ➢ भात पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची भात पोटरीच्या अवस्थेत असताना ५ ते १० सें. मी ठेवावी व फुलोरा अवस्थेत असताना १० सें. मी ठेवावी<br>➢ मागील आठवड्यामद्धे वारंवार पडणारा पाऊस आणि जास्त आद्रता यामुळे भात पिकावर काही ठिकाणी तपकिरी तुडतुडे आणि हिरवे तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे प्रादुर्भाव दिसून येताच फिप्रोनिल ५एस.सी. २० मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एस.एल. २ मि.ली. प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करावी (घाट भाग) |
| मका | तुरे येणे | ➢ मागील आठवड्यामध्ये पडलेला पाऊस, सकाळची सापेक्ष आद्रता >८० व कमाल तापमान २८.० ते ३०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहिल्यामुळे मका पिकावर अमेरिकन लष्करी आळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच खलीलप्रमाणे नियंत्रण करावे |

# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com


| | | |
|---|---|---|
| | | **जैविक नियंत्रण**<br>➢ **या किडीच्या अंड्यावर उपजीविका करण्याऱ्या ट्रायकोग्रामा या परोपजीवी कीटकांची हेक्टरी** ५०,००० अंडी दहा दिवसांच्या अंतराने तीन वेळा शेतात सोडावीत.<br>➢ **प्रभावी नियंत्रणासाठी मेटारायझीअम (नोमुरिया) रिलाय** (१.१५ टक्का डब्ल्यू.पी.) ५० **ग्रॅम प्रति** १० लिटर पाण्यात मिसळून प्रादुर्भाव दिसून येताच १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात.<br>**रासायनिक नियंत्रण**<br>धान्य उत्पादनासाठी घेण्यात येणाऱ्या **मक्यावरील अमेरिकन लष्करी अळीच्या प्रभावी नियंत्रणासाठी**, (प्रति १० लिटर पाणी) स्पिनेटोराम (११.७ टक्के एस. सी.) ५ मिलि किंवा फ्ल्युबेन्डायमाईड (२० टक्के डब्ल्यू. जी.) ५ ग्रॅम किंवा इमामेक्टीन बेन्झोएट (१.५ टक्का) अधिक प्रोफेनोफॉस (३५ टक्के डब्ल्यू. डी. जी.) १५ मिलि<br>➢ वरील कीटकनाशकांची आलटून पालटून फवारणी करावी. |
| मूग | शेंगा भरणे ते पक्वता | ➢ पावसाची उघडीप पाहून पक्व झालेल्या शेंगांची वेळेत काढणी करावी. काढणी उशिरा केल्यास पक्व झालेल्या शेंगा तडकतात.<br>➢ पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेती मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| सोयाबीन | शेंगा भरणे | ➢ मागील आठवड्यामध्ये सततचा पाऊस, ढगाळ हवामान, हवेमध्ये जास्त आद्रता असल्यामुळे सोयाबीन पिकावर तांबेरा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. वाऱ्यामार्फत तांबेरा रोगाचे बिजाणू पसरतात. शेंगा भरण्याच्या अवस्थेत जास्त प्रादुर्भाव. जमिनीलगतच्या पानांवर प्रादुर्भाव आढळून येतो. बाधित पाने पिवळी पडतात. मुख्य शिरेजवळ लहान आकाराचे पिवळसर तांबूस रंगाचे ठिपके जास्त प्रमाणात दिसतात. तीव्रता वाढली की मातकट रंगाचे डाग पानाच्या दोन्ही बाजूस तसेच देठ, कोवळे खोड, फांद्यांवर दिसतात. छोटे ठिपक्यामध्ये तांबूस तपकिरी रंगाची पावडर तयार होते. अकाली पानगळ होते. त्यामुळे शेंगेत दाणे भरले जात नाहीत अथवा बारीक, रोगट व सुरकुतलेले दाणे तयार होतात.<br>**नियंत्रण :** जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>**फवारणी : प्रति लिटर पाणी**<br>➢ प्रोपीकोनॅझोल (२५ टक्के ईसी) १ मिलि किंवा<br>➢ हेक्झाकोनॅझोल (५ टक्के ईसी) १ मिलि किंवा<br>➢ अझॉक्सीस्ट्रॉबिन (१८.२) टक्के अधिक डायफेनोकोनॅझोल (११.४ टक्के एससी) संयुक्त बुरशीनाशक १ मिलि |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ ढगाळ हवामानामुळे तसेच पावसाचे प्रमाण जास्त असलेल्या भागात ऊसावरील तांबेरा व तपकिरी ठिपके या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव झाल्यास रोगाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी अँझोऑक्सीस्ट्रॉबीन १८.२% + डायफेनकोन्याझोल ११.४% एस.सी. ०.१% (१० मिली प्रति १० लिटर पाणी) या संयुक्त बुरशीनाशकाच्या तीन फवारण्या रोगाच्या प्राथमिक लक्षणे दिसून आल्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने कराव्यात |
| टोमॅटो | फळधारणा | ➢ ढगाळ हवामान व जास्त आद्रता यामुळे टोमॅटो पिकावर काही ठिकाणी फळे पोखरनाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आलेला आहे<br>➢ ही अळी प्रथम पाने खाते व नंतर हिरवी किंवा पिकलेली फळे पोखरुन आत शिरते व गर खाते.<br>➢ नियंत्रणासाठी नोव्हॅलीरॉन १० % ईसी १५ मिली **किंवा** क्लोरॅनट्रॅनीलीप्रोल १८.५ % एस.सी.३ मिली १० लिटर पाण्यात मिसळुन ८ ते १० दिवसांच्या अंतराने २-३ फवारण्या कराव्यात.<br>➢ जोरदार वाऱ्याने टोमॅटो झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून फळझाडांना बांबू/काठीच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| भेंडी | फळधारणा | ➢ ढगाळ हवामान व जास्त आद्रता यामुळे भेंडी पिकावर फळे पोखरनाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी किडकी फळे मातीत पुरावीत. फवारणीसाठी डेल्टामेथ्रीन २.८% ई.सी. १० मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% ई.सी. ६ मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात आलटून पालटून फवारणी करावी अधून मधून ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी.<br>➢ ट्रायक्रोकार्ड १० प्रति हेक्टर या प्रमाणात वापरावे. |
| पशुधन | वाढीची | ➢ अस्वच्छतेमुळे स्तनदाह होवु नये यासाठी कासेची स्वच्छता ठेवावी<br>➢ पावसामुळे गोठ्यातील वातावरणात आर्द्रता वाढते आणि जनावरे अस्वस्थ होतात. हे टाळण्याकरीता गोठयातील हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी |

| | |
|---|---|
| मेघदूत ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. : १६.०९.२०२५

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक